# अश्वत्थामा - भाग २

माहिमला घरापाशी पोचून गाडी पार्क करून मी वर माझ्या घरी आलो.

एक बरं होतं, आज आई-बाबा ठाण्याला आत्याकडे गेले होते. आणि रात्री तिथेच रहाणार होते. त्यामुळे मी असा परत का आलोय हे विचारायला घरी कुणी नव्हतं.

घरात शिरल्या शिरल्या रूपालीला फोन करण्यासाठी मी सॅकमधून मोबाइल काढला. एकीकडे मनात सगळे डायलॉग जुळवले.

"आज ऑफिसमधून निघतानाच अंग सणकून आलं होतं. घरी आल्या आल्या एक क्रोसीन घेऊन जरा पडलो. आणि झोपच लागली बघ. आता जागा झालोय. लगेचच तुला फोन लावला. सॉरी, खरंच सॉरी. पण आज अगदी येववत नाहीये. उद्या सकाळी लवकर उठून येतो मी कांदिवलीला."

जुळवलेल्या सगळ्या शब्दांची मी पुन्हा पुन्हा उजळणी केली आणि रूपालीला कॉल केला.

तिचा फोन एंगेज लागला. पाच मिनिटांनी परत लावला, तरीही तेच. अ‍ॅक्चुली माझ्या मोबाइलवर रूपालीचे जवळ जवळ पंधरा एक मिस कॉल्स होते. मॅडम जाम भडकल्या असाव्या बहुदा. किती फोन केलेत. आणि आता मी फोन करतोय तर स्वत:चा फोन एंगेज ठेवलाय वाटतं?

दहा मिनिटांनी तिच्या घरच्या लॅन्डलाईनवर फोन लावला. तो खूप वेळ नुसताच रिंग होऊन बंद झाला. पुन्हा ट्राय केलं तरी तेच. पावसामुळे कदाचित लॅन्डलाईन बंद असेल आणि एक्सचेंजला नुसती रिंग जात असेल.

अविदादाला बर्थडे विश करायचं आहेच. तेव्हा त्याच्या मोबाइलवर करावा फोन आणि नंतर रूपालीशीही बोलावं असं मी ठरवलं.

दादाच्या मोबाइलवर फोन केला पण आज काय योग होता नकळे. दादा वहिनी, सगळ्यांचे फोन नुसते रिंग होत होते.

शेवटी मी मनाशी विचार केल, "बहुदा आज सगळ्यांनी ठरवून माझा कॉल आला तर तो घ्यायचा नाही असा कट केलेला दिसतोय. राग व्यक्त करण्याचा गांधीवादी उपाय दिसतोय हा."

मी बेसिनपाशी जाऊन तोंडावर पाण्याचे जोरजोरात हबके मारले. तो अपघाताचा प्रसंग मला धुवून टाकायचा होता. आणि नेमका तोच डोळ्यांपुढून जात नव्हता.

फ्रीजमधून दूध काढून मी कडक कॉफी बनवली. काही खायची इच्छा नव्हतीच. कॉफी पिऊन बेडरूममध्ये जाऊन मी बेडवर पडलो. निद्रादेवीने कधी घेरलं तेही कळलं नाही.

टेलिफोनच्या रिंगने जाग आली. घड्याळ पाहिलं तर पहाटेचे साडेपाच झाले होते. फोन घेतला. पलिकडून रूपालीच्या शेजारचे केतकरकाका बोलत होते.

“सागर बरे आहात ना? काल रात्रीपासून तुम्ही फोन उचलत नाही आहात. नशीब, आता तुमचा घरचा नंबर मिळाला म्हणून त्यावर फोन केला आणि तुम्ही भेटलात. तुम्ही आता लगेच निघून इकडे कांदिवलीला येऊ शकाल का?"

“का हो काका? तिकडे सर्व ठीक आहे ना? मी काल रात्री येणार होतो. पण तापाने फणफणलो होतो म्हणून..."

माझं वाक्य पुंर्ण ऐकण्याआधीच काका पलिकडून म्हणाले, “लगेचच निघा. सांभाळून या. भेटल्यावर बोलू. ठेवतो फोन."

“काका, अण्णांची तब्येत....” मी काही बोलेपर्यंत पलिकडून काकांनी फोन ठेवला सुद्धा होता. काय असेल? तिकडे सर्व ठीक असेल ना? मग काकांचा आवाज जरासा घोगरा का वाटला मला? विचार करण्यात वेळ घालवायला नको. निघावं लगेच.

अंगावरच्या माझ्या कपड्यांकडे माझं लक्ष गेलं आणि कळलं काल रात्री कपडेसुद्धा न बदलता मी तसाच झोपून गेलो होतो. मोबाइल बाहेर टीपॉयवर होता. तो उचलला. मोबाईलवर रूपालीचे आणि इतरही बरेच सारे माहीत नसलेले मिस्ड कॉल्स होते. इतके सारे फोन येऊन गेले आणि मला कळलंच नाही? मग एकदम ट्युब पेटली. काल मिटिंगच्या वेळी ऑफिसमध्ये मी मोबाइल सायलेंटवर ठेवला होता तो अजूनही सायलेंन्ट मोडवरच होता. त्यामुळे मला कुणाचेच फोन आल्याचं कळलं नव्हतं.

मी जरा फ्रेश झालो. लगेच निघालो. गाडी काढली.

अजून उजाडलं नव्हतं. आज पाऊसही नव्हता. हायवेने जाताना पार्ल्याच्या कालच्या स्पॉटपाशी मन व्यथित झालं, उदासलं.

कांदिवलीला रूपालीच्या सोसायटीपाशी पोचलो. खाली गेटपाशी काहीजण उभे असलेले दिसले. कुणी हळू आवाजात कुजबुजत होते. मी कुणाला ओळखत नव्हतो. त्यांच्यातून वाट काढत मी लिफ्टने रूपालीच्या घरी पाचव्या मजल्यावर पोचलो.

केतकरकाका लिफ्टच्या दाराशीच माझी वाट पहात होते. मजल्यावरच्या चारही ब्लॉकचे दरवाजे उघडे होते. काकांनी पुढे होऊन मला हाताला धरून त्यांच्या घरात नेलं.

माझ्या मनांत आलं, रूपालीच्या घरात डोकवायला हवं होतं....

मला बसवून माझ्या शेजारी सोफ्यावर बसत कसेबसे शब्द जुळवत काका मला सांगू लागले, “सागर, काल रात्री अविनाशला ॲक्सिडंट झाला..."

काकांना हुंदका आवरेना. मी त्यांना शांत करायचा प्रयत्न केला. हे सगळं कसं, कधी, कुठे झालं म्हणून विचारलं.

काका म्हणाले, “काल अविच्या ऑफिसमधल्या त्याच्या एका मित्राच्या आईला हार्टअॅटॅक आला. त्याने अविला कळवलं. तो मित्र एकटाच होता. त्याच्या सोबत कुणी नव्हतं. म्हणून अवि मग

लगेचच इथून निघून पार्ल्याला नानावटी हॉस्पिटलला गेला. काल संध्याकाळपासून त्या मित्राबरोबर नानावटीमध्येच होता अवि. त्या मित्राचे कुणी नात्यातले तिथं पोचल्यावर मग निघाला तो हॉस्पिटलमधून. उशीर झाला होता बराच. खरं तर काल पोराचा वाढदिवस. तुमचा सेलिब्रेशनचा प्लॅन मला अण्णांकडून काल दुपारीच कळला होता. पण मित्राचे कुणी नातेवाईक तिथे हॉस्पिटलमध्ये येईपर्यंत त्याच्यासोबत म्हणून हा थांबला होता. नानावटीमधून निघून येत असताना पार्ल्याच्या फ्लायओव्हरच्या तिथे एका मोटरवाल्याने ह्याच्या स्कूटरला धडक दिली. हा स्कूटरवरून फेकला गेला. ब्रेन हॅमरेज होऊन खूप रक्तस्त्राव झाला होता. ॲक्सिडेंटनंतर बऱ्याच वेळाने तिथून जात असलेल्या एका डॉक्टर दांपत्याने पोलिसला कळवलं, इकडे घरी कळवलं. त्याला हॉस्पिटलला ॲडमिट केलं. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं तेव्हाही धुगधुगी होती रे त्याच्या अंगात. हॉस्पिटलचे डॉक्टरही म्हणाले तसं. पण खूप रक्तस्त्राव झाला होता. डॉक्टर नाही वाचवू शकले आपल्या अविला. त्याला वेळीच मदत मिळाली नाही. उशीर झाला हॉस्पिटलमध्ये न्यायला..." काकांचे शब्द तापलेल्या सळईसारखे माझ्या कानात शिरून मला चर्रर करत होते.

"सागर, कसं सांगू तुम्हाला? लगेच त्याला ॲडमिट केलं असतं तर कदाचित ...डॉक्टर म्हणत होते ...अहो, रेखाच्या हातावरची मेंदीपण अजून पुरती धुतली गेली नसेल. तोपर्यंत हे असं... रेखा, अण्णा-वहिनी पार थिजून गेलेत हे सर्व ऐकून, पाहून. रूपालीने कसाबसा धीर धरत आम्हा सगळ्यांच्या मदतीने काही फॉर्म्यालिटिज केल्या. बॉडी हॉस्पिटलमध्येच आहे अजून. अण्णांचे भाऊ, रेखाचे आई वडील, तुम्ही, असे सगळे आल्यावर पुढचं कसं करायचं ते ठरवायचंय..."

काकांना मला हे सगळं सांगताना सारखं गदगदून येत होतं.

माझ्या डोळ्यांपुढे अंधार दाटला. त्या अंधाराचा खूप मोठा राक्षस बनून तो मला गिळायला येतोय असा मला भास झाला.

कालची रात्र - तो धुंवाधार कोसळणारा पाऊस- रात्री साडेनऊची वेळ - पार्ल्याच्या फ्लायओव्हरपाशी माझ्या गाडीची एका स्कूटरवाल्याला बसलेली धडक...

ओ गॉड! देवा! हे काय होऊन बसलं?

"भ्याड साला तो गाडीवाला... नीच. थांबलाही नाही. पळून गेला तसाच. कोण होता काही कळलं नाही. पण देव त्याला शिक्षा केल्याशिवाय राहणार नाही बघ." मला कसंबसं सर्व सांगायचा प्रयत्न काकांनी केला.

मी गोठून पार बर्फ झालो. मनाचं मूक रूदन... तो आक्रोश माझ्या कानांचे पडदे फाडून टाकू पहात होता... एकदा वाटलं, आता तरी स्वत:च्या सद्सदविवेक बुद्धीला जागं करावं. आपला अपराध सांगून टाकावा...

पण मी भ्याड ठरलो. कुरूक्षेत्रावर कर्णाच्या रथाचं चाक जसं जमिनीत रुतलं होतं. तसा मी ह्या साऱ्यात रुतलो होतो... माझ्याकडून अजाणतेपणी घडलेल्या ह्या भयंकर अपराधाला कधीच क्षमा होऊ शकणार नव्हती...

रूपालीच्या घरी तिचे आई-बाबा वहिनी सगळ्यांना मी कसं सामोरं जाऊ? भले त्यांना कालच्या ह्या घटनेचा आणि माझा संबंध माहीत नाही. पण माझं काय? सगळ्या जगाला आणि रूपालीला जरी मी कायम अंधारात ठेवलं तरी माझ्या मनातून ही व्यथा मी कधीच हद्दपार करू शकणार नाही. कालची ती भीषण वेळ मला कायमच सलत राहील. देवाने मला दिलेली ही भयंकर शिक्षा होती. रूपालीच्या घरी मी आता कुठल्या तोंडाने जाणार होतो?

“अरे, अण्णांच्या सारख्या प्रेमळ देवमाणसाच्या कुटुंबाची अशी वाताहात करणाऱ्या त्या गाडीवाल्याला देव नरकातही जागा देणार नाही..."

नेहमी शांत, मितभाषी असणाऱ्या केतकरकाकांच्या तोंडून जणू वेदवाणीच निघाली होती.

माझा अश्वत्थामा झाला होता... आणि ती भळाळती जखम घेऊनच मला यापुढे जगावं लागणार होतं....!!

----------x----------x----------

(समाप्त)

**लीना माटे**

**मो. 9819534428**

**Email- leenashining@gmail.com**